# मी विठ्ठल पाहिला ?

## वारी अनुभव - लेख क्र. ८- जेजुरी ते वाल्हे - पुढे

**- राजश्री कुलकर्णी** (साऊथ ब्रुन्सविक, न्यू जर्सी)

जेजुरी ते वाल्हे फक्त १५-१६ किलोमीटर्सचा प्रवास होता. आम्ही दोन ठिकाणी विसावा घेतला. पहिल्या विसाव्यात थोडं पिठलं भाकरी खाल्लं. दुसरा विसावा एका सिताफळाच्या बागेत घेतला.

सिताफळाच्या बागेत लोकांनी खूपच नासधूस केली. बऱ्याच ठिकाणी 'घाण' करून ठेवली. काहींनी गंमत म्हणून झाडांच्या



फांद्या ओरबाडल्या, तर काहींनी कच्ची सिताफळं तोडली. ते बघून खरंच वाईट वाटलं.

**वारकरी म्हटला की डोळ्यासमोर एक व्यक्ती उभी राहते... गळ्यात तुळशी माळ, कपाळावर चंदनाचा टिळा, पांढरेशुभ्र कपडे आणि हातात भगवा ध्वज घेतलेली! १०० - १०५ अंश फॅरनहाइट तापमानात माझी मात्र 'फुलनदेवी' झाली होती.**

पावणे दोनच्या सुमारास जेवायला बसले. सुधारस, वांग्याची भाजी, पोळी, आमटी, वरण-भात असा बेत होता. थोडा आराम केला. बाथरूमसाठी आज पहिल्यांदा 'बाहेर' जावं लागलं. नेहमीप्रमाणे आधी पुरुषांची सोवळ्यातील पंगत बसली. त्यानंतर बायकांची पंगत!

आज कां माहिती नाही, पण दोन्ही पोटऱ्यांमधे गोळे येत होते. पहिला विसावा झाल्यानंतर (खाल्ल्यानंतर) जास्त त्रास व्हायला लागला. उन्हामुळे ग्लानी येत होती. उन्हामुळे चक्कर येत होती की (फक्त चारच तास) झोप कमी झाल्यामुळे, ग्लानी येत होती, कुणास ठाऊक!

दुपारी मुरगळलेला पाय थोडा सुजल्यासारखा वाटत होता. "I hope it's not a fracture", असा एक विचार मनात आला. दुसरा विचार लगेच म्हणाला की, "फ्रॅक्चर असता तर पाय टंब फुगला असता, चालताही आलं नसतं... चला म्हणजे फ्रॅक्चर नक्की नाही. २१ सप्टेंबर १९१४ ला फिलाडेल्फियाच्या हाफ-मॅरथॉनसाठी रजिस्टर केलं होतं. त्यात भाग घेऊ शकेन ना?"... असाही विचार डोकावून गेला.

आज सकाळी मात्र खूप मज्जा आली. मी आज 'तळा'पर्यंत चालत गेले. **सूर्योदय** बघायला मिळाला. फोटोज् काढले.



'वारकरी टिळा' लावून घेतला. वारीमध्ये निरनिराळे व्यवसाय करणाऱ्यांचा समावेश होता. 'वारकऱ्यांना गंध लावून देणारे' हे अशा प्रकारचा



व्यवसाय करणाऱ्यातले एक होते. गंध, बुक्का, चंदन ते लावून द्यायचे आणि आपण त्यांना आपल्या मर्जीप्रमाणे १ रुपया ते ५ रूपये द्यायचे. न कुरकुरता ते मनापासून त्याचा स्वीकार करायचे.

वारीतल्या निरनिराळ्या लोकांशी बोलून वेगवेगळे अनुभव येतात. एकजण म्हणाले, की व्यायाम म्हणून ते वारीला येतात. पण असा एखादा तुरळक वारकरी सोडला तरी बाकी सगळे वारकरी भाविक आहेत.

स्त्रिया आणि पुरुष इथे शक्यतोवर एकमेकांशी बोलताना दिसत नाहीत. कित्येक वर्षे नेमाने वारी करणारे आणि रोज नियमित चहा वाटप करणारे, देशपांडेकाका आज स्वत: गप्पा मारायला आले, म्हणाले, **"सतत नाम घेत रहा! नाम कोणतंही**



**घेतलंस तरी चालेल, पण नाम <u>सातत्याने</u> घेणं महत्वाचं आहे!"**

आजच्या दिवसाच्या प्रवासाची सुरुवात तर मस्तच झाली होती. पायी चालणं... Walk मात्र अजूनही परीक्षा घेत आहे. मग सकाळी भेटलेले, पायांना कपडा गुंडाळलेले, डोळ्यांनी अधू असलेले वारकरी आठवले, आणि वाटलं की त्यांच्या तुलनेने आपल्याला झालेला त्रास काहीच नाही. वारी प्रवासातल्या छोट्या छोट्या गोष्टी दर दिवशी मला पटवून देत होत्या, की आपण किती नशीबवान आहोत... touch wood!

वारी पूर्ण व्हायला अजून ११ दिवस बाकी आहेत. शेवटपर्यंत पायी प्रवास पूर्ण होऊ दे..."ज्ञानोबा माऊली तुकाराम"! **(क्रमश:)**